## आदेश निशाणी क्र. ३३२

(दिनांक १०/१०/२०२४)

१. प्रतिवादी क्र. १३ ब ते १३फ यांनी प्रस्तुत अर्ज नि. ३३० कडील मोडी भाषेतील गहाणखताच्या लिप्यांतराकरीता मुळ गहाणखत परत मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १३ब ते १३फ यांच्या कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र. १३ यांनी नि. ३३० कडे बाबाजी सखाराम पेडणकर यास केशव शिवराम मुळीक यांनी लिहून दिलेले दिनांक २१/३/१९४२ रोजीचे मुळ मोडी लिपितील गहाणखत हजर केले आहे. सदर गहाणखतासोबत त्याची मराठी भाषेतील लिप्यांतर प्रत नि. १६५/1 कडे हजर केली आहे. सदर गहाणखताचे लिप्यांतर हे विठ्ठल आत्माराम केसरकर यांनी केले आहे, परंतु ते आता मयत आहेत. त्यामुळे प्रतिवादीस सदर मोडी भाषेतील गहाण खताचे लिप्यांतर दुसऱ्या व्यक्तीकडून करुन घ्यावयाचे आहे व त्याकरीता त्यास नि. ३३० वरील मुळ गहाणखताची आवश्यकता आहे. प्रतिवादी गहाणखताचे लिप्यांतर झाल्यावर मुळ गहाणखत पुन्हा हजर करतील या अटीवर त्यांना गहाणखताची मुळ प्रत देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

३. वादी क्र. १अ ने सदर अर्जावर नि. ३३३ वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो दिवाणी प्रक्रिया संहितामधील अनिवार्य तरतुदीस धरुन नसल्याने खर्चासह फेटाळून लावण्यास पात्र आहे. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज हा दाव्याचा न्यायनिर्णय होण्यास विलंब करण्याच्या हेतुने दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे धडेवाटप होवून पृथक कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दावा हा सन १९८३ पासून प्रलंबित आहे. सदर दाव्यात प्रतिवादीने त्याच्या बचावार्थ पुराव्या दरम्यान दिनांक २१/३/१९९४२ रोजीचे

मुळ गहाणखत दाखल केले आहे. सदर गहाणखत हे मोडी लिपितील आहे. प्रतिवादीने गहाणखत दाखल करतेवेळी त्याची मराठी भाषेतील लिप्यांतर प्रत देखील नि. १६५/१ कडे हजर केली होती. परंतु सदर लिप्यांतर करणारे विठ्ठल आत्माराम केसरकर हे मयत झाले आहेत त्यामुळे त्यांनी केलेली मराठी भाषेतील लिप्यांतर प्रत पुराव्यात सिध्द होवू शकत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीला दुसऱ्या व्यक्तीकडून मोडी लिपितील गहाणखताची मराठी भाषेत लिप्यांतर केलेली प्रत अभिलेखावर दाखल करणे अत्यावश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजुर केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्र. १३ ब ते १३फ यांना नि. ३३० कडील मोडी भाषेतील गहाणखताची मुळ प्रत मराठी भाषेत लिप्यांतर करण्याकरीता देण्यात यावी.

०३. प्रतिवादी क्र. १३ ब ते १३फ यांनी नि. ३३० कडील मोडी भाषेतील गहाणखताची मुळ प्रत घेताना त्याची सत्यप्रत अभिलेखावर दाखल करावी.

०४. प्रतिवादी क्र. १३ ब ते १३फ यांनी नि. ३३० कडील मोडी भाषेतील गहाणखताची मुळ प्रत मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत त्याची मराठी भाषेतील लिप्यांतर प्रत मुळ प्रतिसह अभिलेखावर दाखल करावी.

०५. सदर अर्जाचा खर्च प्रतिवादीने सोसावयाचा आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2024.10.11 15:29:04 +0530

सावंतवाडी .
दिनांक १०/१०/२०२४.

(जा.म.मिस्त्री )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी